अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

संस्थापक : नाट्याचार्य कृष्णाजी प्रभाकर खाडिलकर

नवा काळ

।। न मे भक्त: प्रणश्यति ।।

अग्रलेखांचा नवा काळ बादशहा

# पाकिस्तान दाऊदचे दान करेल का

सालाबादप्रमाणे सरकारी पातळीवर अनेक घोषणा होत असतात. त्यातली यावर्षीची ताजीतवानी घोषणा म्हणजे दाऊद इब्राहिमला लवकरच भारतात आणले जाणार आहे. केंद्रीय गृहमंत्री सुशिलकुमार शिंदे यांनी सोलापूरला ही महत्त्वपूर्ण माहिती दिली. या अत्यंत महत्वपूर्ण आणि तितक्याच संवेदनशील माहितीसाठी सोलापूरची निवड का केली हे आम्हाला माहीत नाही. कारण ज्या दाऊद इब्राहिमला पकडण्यासाठी अगदी इंटरपोलपासून भारतातल्या रॉ सारख्या यंत्रणा प्रयत्न करत आहेत. त्यासाठी रेडकॉर्नर नोटिसाही झळकवल्या गेल्या आहेत. त्यातला कुतुहल चाळवणारा भाग म्हणजे गेल्या दोन-तीन वर्षांपासून दाऊदविषयी कोणतीच चर्चा किंवा माहिती दिली जात नव्हती. दाऊद इब्राहिमला भारतात आणणे आता शक्य नाही किंवा ती गोष्ट भारत कधीही करू शकणार नाही. भारताच्या शक्तीबाहेरची किंवा आवाक्याबाहेरची ती गोष्ट आहे अशी लोकांची ठाम खात्री झाली असताना आता अचानक एकदम मध्येच दाऊदला भारतात आणण्याविषयी कशी काय माहिती दिली गेली, याचेच लोकांना आश्चर्य वाटू लागले. पाकिस्तानात दाऊद कुठे आहे याचा थांगपत्ता भारताला लागला आहे. त्याचा पाकिस्तानातला नेमका ठावठिकाणा सांगून त्याला भारताच्या स्वाधीन करण्याच्या हालचाली सुरू झाल्याचे शिंदे यांनी आपल्या विधानांमधून सूचित केले आहे. त्याला लवकरच भारतात आणले जाईल, असे त्यांनी म्हटले आहे. आतापर्यंत 'लवकर' हा शब्द इतक्या लवकर लवकर वापरला गेला की त्याचा अर्थच बदलून गेला. ज्याप्रमाणे रेल्वे स्टेशनवरच घोषणा होतात की अमुक अमुक वाजताची ट्रेन लवकरच प्लॅटफॉर्म क्रमांक अमुकवर अपेक्षित आहे. त्यातल्या लवकर या शब्दावर लोकांचा विश्वास नसतो. कारण नेमक्या किती वेळात, किती मिनीटांत ती गाडी येणार हे कळलेले नसते. म्हणजे मग ती गाडी केव्हा येणारा याचा काहीच अंदाज नसतो. तसाच प्रकार दाऊद इब्राहिमला लवकर भारतात आणणार या विधानाचाही होतो. लवकरच म्हणजे केव्हा? तर त्याचे उत्तरही लवकरच असेच द्यावे लागते. आणि दाऊदला आणता येणे किती कठीण आहे हे गेल्या २५ वर्षांत सिध्द झाले आहे. ९२-९३ मध्ये मुंबईत १२ बॉम्बस्फोट झाले. ते घडवून आणण्याचे काम दाऊदने केले. त्यानंतर मुंबईतली दंगल पेटविण्यात तोच आघाडीवर होता. मुंबईचा गुन्हेगारी विश्वाचा डॉन बनून त्याने किती आणि कशी दहशत निर्माण केली हे सगळ्यांनाच माहीत आहे. ज्यावेळी महाराष्ट्रात सेना भाजपाची सत्ता आली तेव्हाचे उपमुख्यमंत्री आणि गृहमंत्री गोपीनाथ मुंडे यांनी दाऊदला फरफटत भारतात आणू अशी टाळ्याखाऊ घोषणा केली होती. फरफटत आणण्याची गोष्ट तर सोडाच त्याच्या नखालासुध्दा सरकार धक्का लावू शकलेले नाही. अशा या डॉनला लवकरच भारतात आणण्याचे सरकारने ठरवले असेल तर ती नुसती वल्गना ठरणार नाही याचीसुध्दा काळजी घ्यावी लागेल.

### लवकर म्हणजे केव्हा

कदाचित केंद्रीय स्तरावर गृहमंत्रालय दाऊदला पाकिस्तानने भारताकडे सोपवावे म्हणून प्रयत्न सुरू असले तरी त्याला थोडाफार सकारात्मक किंवा होकारात्मक प्रतिसाद मिळाला असेल म्हणून भारताच्या आशा पल्लवित झाल्या असतील. परंतु इतक्या सहजासहजी दाऊदला भारताच्या स्वाधीन केले जाईल का? असा प्रश्न आहे. मुंबईवर दहशतवादी हल्ला झाला त्यावेळीसुध्दा दाऊदने सर्व कारस्थान घडवून आणल्याचे उघड झाले होते. त्यावेळीसुध्दा दाऊदला भारताकडे सोपवा, असे पत्र पाकिस्तानला पाठवले ते पत्र पाकिस्तानने अक्षरश: कचऱ्याच्या टोपलीत टाकले. भारताच्या या इतक्या महत्त्वपूर्ण मागणीला कवडीचीही किंमत न देणारा पाकिस्तान भारताला दाऊदचे दान करेल यावर विश्वास ठेवता येत नाही. भारताचा जो प्रयत्न चालला आहे तो किती आग्रही स्वरुपाचा आहे हे आम्हाला माहीत नाही. पाकिस्तानबरोबरच्या संबंधांचा विचार करून आणखी कोणत्या मार्गाने दाऊदला आणण्याचे प्रयत्न चालू आहेत याचाही उलगडा झालेला नाही. केवळ पाकिस्तानातला त्याचा ठावठिकाणा लागला याचा अर्थच त्याला आपण भारतात आणू शकू, असा भाबडा विश्वास ठेवण्यात फारसा अर्थ नाही. दाऊद हे भारतासाठी लागलेले हे ग्रहणच आहे. त्याकरता पाकिस्तानने त्याचे दान करावे, असे जर भारताला वाटत असेल तर ते नीट समजून घ्यावे लागेल. आतापर्यंतच्या अनुभवाप्रमाणे पाकिस्तानने नेहमीच भारताला डिवचण्याचाच प्रयत्न केला. दाऊदला भारतात आणायचे असेल तर पाकिस्तानवर फार मोठा दबाव निर्माण करावा लागेल आणि त्याला गुन्हेगार हस्तांतरण करावयाच्या माध्यमातूनच आणणे शक्य होऊ शकते. अजूनही भारतीय तपास यंत्रणांनी या संदर्भात जी आक्रमकता दाखवायला हवी किंवा भारतासाठी दाऊद किती महत्त्वाचा आहे हे ज्या पध्दतीने पटवून द्यायला हवे, त्या पध्दतीने ते अजूनही पटवून दिलेले नाही आणि म्हणूनच दाऊद तितक्याच बिनधास्तपणे पाकिस्तानामध्ये मुक्काम ठोकून आहे.

### ...तर ती यूपीएची मोठी कामगिरी

एक गोष्ट तर निश्चितपणे लक्षात घ्यावी लागेल की, गेल्या वीस वर्षांमध्ये अनेक प्रकारे भारताने प्रयत्न केले. त्याला पाकिस्तानने दाद दिली नाही. यासाठी ही एक राजकीय इच्छाशक्ती सरकारदरबारी असायला हवी तीही पहायला मिळाली नाही. आजही दाऊदची मुंबईत प्रॉपर्टी आहे. ही जप्त करून लिलावात विकण्याचा प्रयत्न झाला. परंतु ती घेण्यासाठी कोणीही पुढे आले नाही. यावरून मुंबईतली त्याची दहशत कमी करण्यात आपले सरकार कमी पडलेले आहे. एवढेच नव्हे तर अजूनही दाऊदच्या नावाने मुंबईच्या गुन्हेगारी विश्वामध्ये खंडण्या उकळण्याचे काम चालल्याने त्याचे काही हस्तक तस्करीदेखील करत असतात. म्हणजे पाकिस्तानातून दाऊद जेव्हा यायचा तेव्हा येईल. परंतु त्याच्या मुंबईतल्या साम्राज्याच्या सर्व बाजूंनी मुसक्या आवळण्याचे काम सरकारने केले पाहिजे. त्याच्या इथल्या कारवाया पूर्णपणे थांबल्या पाहिजेत. आणि त्याचबरोबरीने पाकिस्तानवर सर्व बाजूंनी दबाव टाकून त्याला भारताकडे सोपवण्यासाठी भाग पाडले पाहिजे. केंद्रीय मंत्री सुशिलकुमार शिंदे यांना जर दाऊदला लवकर आणू, असा विश्वास वाटत असेल तर ती यूपीए सरकारसाठी फार मोठी कामगिरी ठरेल. पाच-दहा वर्षांत या सरकारने थोडातरी पुरुषार्थ दाखवला, असे मानले जाईल. एवढी महत्त्वपूर्ण माहिती सुशिलकुमार शिंदे यांनी सोलापुरातल्या कार्यक्रमात द्यावी, हेही एक कोडे ठरते. कदाचित त्याच्या प्रतिक्रीया आजमावण्यासाठी त्यांनी तसे केले असावे.